दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२८ वा शुक्रवार दि.२५ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# ना.संजय बनसोडे यांच्या विजयासाठी महायुती एकदिलाने सज्ज : माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे

उदगीर / बाबासाहेब मादळे :- होवु घातलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांची उमेदवारी जाहिर केली असुन त्यांच्या विजयासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते एकदिलाने सज्ज झाले असल्याची माहिती लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी दिली. येथील माजी आ.गोविंदराव केंद्रे यांच्या निवासस्थानी ना.संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ भाजप कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलत होते.

या बैठकीला राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, विनायकराव बेंबडे, भगवानराव पाटील तळेगावकर, रामचंद्र तिरुके, बसवराज पाटील कौळखेडकर, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, बापुराव राठोड, पंडित सुर्यवंशी, हणमंत हंडरगुळे, शिवशंकर धुप्पे, मनोज पुदाले, सुधीर भोसले, अॅड.दत्ता पाटील, बस्वराज रोडगे, साईनाथ चिमेगावे, अमोल निडवदे, बालाजी गवारे, संजय पाटील, विजय पाटील, संगम आष्टुरे, सुदर्शन माने, धर्मपाल नादरगे, रमेश शेरीकर, प्रदीप जाधव, रामराव बिरादार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राहुल केंद्रे म्हणाले की, सामान्य जनता ठाकरे सरकारवर नाराज झाली होती. त्यासोबतच ठाकरे सरकार मधील अनेक मंत्री नाराज झाल्याने त्यांनी भाजपासोबत येऊन सरकार स्थापण केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आलेल्या सरकारने सामान्य जनतेच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले. नंतरच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांनीही महायुतीच्या सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सरकारला आणखी बळ मिळाले. या अडीच वर्षाच्या काळात भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षाच्या सरकारने राज्यातील सामान्य जनतेच्या हितासाठी झपाटून काम केले. विविध योजना सर्वसामान्यांच्या दारी पोहचवल्या. महिलांना स्वबळावर उभे राहावे यासाठी सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवली. शेतकऱ्यांसाठी अनेक क्रांतिकारी योजनांचे निर्णय घेतले. त्यामुळे सामान्य जनतेच्या मनात महायुतीच्या



सरकारबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री नामदार संजय बनसोडे यांनी आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात उदगीर मतदार संघात कोट्यावधी रुपयाचा विकास निधी खेचुन आणून उदगीरचा कायापालट केला. केवळ विकास कामे करून ते थांबले नाहीत तर सामान्य जनतेशी ते कायम संपर्क ठेवून जनतेतला मंत्री म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. आज विरोधक दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु उदगीरच्या विकासासाठी पुन्हा एकदा संजय बनसोडे निवडून येणे ही काळाची गरज आहे. महायुतीने ना. संजय बनसोडे यांची उमेदवारी आज जाहीर केली असून आगामी काळात त्यांना निवडून आणण्यासाठी आपण सर्वजण एक दिलाने काम करू असा विश्वासही यावेळी राहुल केंद्रे यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजी मंत्री आ अमित देशमुख यांनी प्रकाश नगर येथील नालंदा बौद्ध विहाराला दिली सदिच्छा भेट तर सायगाव येथील दरगाह येथे केली चादर अर्पण





लातूर /प्रतिनीधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी लातूर शहरातील प्रकाश नगर येथील नालंदा बौद्ध विहाराला सदिच्छा भेट देऊन भगवान गौतम बुद्ध भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले, तसेच उपस्थितांसोबत बुद्ध वंदना केली. यानंतर दुपारी अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथे जाऊन हजरत सय्यद सादिक अली शाह दरगाह येथे चादर अर्पण करून दर्शन घेतले. आदरणीय बाबा हजरत अख्तर अली शहा यांचे आशीर्वाद घेतले. लातूर येथील नालंदा बौद्ध विहाराला सदिच्छा भेट यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, भन्ते पय्यानंद महाथेरो, भन्ते बोधिराज लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे सुरेश गायकवाड नालंदा बौद्ध विहार कमिटिचे अध्यक्ष उत्तम कांबळे, प्रज्ञा महिला मंडळाच्या अध्यक्षा शशिकला सुरवसे, सोनकांबळे,आपटे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल विजय गायकवाड आयुब मणियार दत्ता सोमवंशी पप्पू देशमुख नागसेन कामेगावकर राजा माने यशपाल कांबळे योजना कामेगावकर सुनील कांबळे राजू गवळी गोटू यादव संजय ओहळ जेष्ठ पत्रकार अशोक देडे हरिभाऊ गायकवाड सुरवसे,प्रवीण सूर्यवंशी, कांबळे,धसवाडिकर प्रा. प्रवीण कांबळे, मकबूल वलांडीकर, राहुल डूमणे, भाऊसाहेब भडीकर, रत्नदीप अजनीकर, मोहन सुरवसे, इमरान सय्यद, सुमित खंडागळे, विजय टाकेकर, किरण बनसोडे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी नागरिक उपस्थित होते यानंतर दुपारी सायगाव येथे हजरत सय्यद सादिक अली शाह दरगाह येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी सय्यद अख्तर अली, शाह हुसैनी, दरबारे मुरशिदी, मोईज शेख, शकील इनामदार, ताजखान पठाण, रफिक पटेल, अरकात खान, परवेज हाश्मी, पाशाभाई गुत्तेदार, सय्यद नयूम, सय्यद असदुल्ला, मुक्तारखा पठाण, चांदपाशा इनामदार, फारुख शेख, युनूस मोमीन, अहमदखा पठाण, सत्तार शेख, इम्रान सय्यद, मकबूल वलांडीकर, तबरेज तांबोळी, हरिभाऊ गायकवाड, राम स्वामी कलीम शेख आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## लातूर ग्रामीण मतदारसंघ हे आमच्यासाठी कुटुंब श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी साधला महिलांशी संवाद

लातूर / प्रतिनीधी :- विकासरत्न विलासराव देशमुख हे लातूर शहर व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाला आपले कुटुंब मानायचे. त्यामुळेच ते जे जे नवं ते लातूरला हवं, असे नेहमी म्हणायचे. त्यांच्या आदर्श विचारावरच आमची वाटचाल सुरु असून आमच्या सर्वांसाठी लातूर शहर व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ कुटुंबच आहे.त्यामुळे या दोन्ही मतदारसंघातील मतदारांनी आपल्या कुटुंबाचे सदस्य असलेले माजी मंत्री आमदार अमित देशमुख व आमदार धिरज देशमुख यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. त्यानिमित्ताने विलास सहकारी साखर कारख्याच्या चेअरम श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी दि. २४ ऑक्टोबर रोजी औसा तालूक्यातील टाका, बिरवली, शिवली, रिंगणी येथे संवाद मेळव्यात महिला मतदाराशी संवाद साधला. यावेळी सौ. दीपशीखा देशमुख, सुनिताताई अरळीकर, शितलताई फुटाणे, औसा महिला कॉग्रेसच्या



अध्यक्ष सईताई गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या पाच वर्षांमध्ये लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांनी आमदार म्हणून काम करताना मतदारसंघात जास्तीत जास्त विकास योजना आणल्या व त्या योजना ग्रामीण भागातील नागरीकापर्यंत पोहोचविल्या आहेत, असे नमुद करुन श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, प्रत्येक गोर-गरीब, कष्टकरी, शेतकजयांसाठी विविध योजनेच्या माध्यमातून काम करण्याचा आमदार धिरज देशमुख यांनी प्रयत्न केला आहे. यापुढेदेखील ते लातूर ग्रामीण मतदारसंघात विकासाची कामे खेचून आणतील, असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी संध्याताई कदम, मिराताई शिंदे, लक्ष्मीताई बंडगर, प्रेमनंदा कदम, अश्विनी भांगे, मेघा कदम, सविता शिंदे, संगीता सावंत, सुरेखा सावंत, अनुजा सावंत, मिरा सावंत, मिना सावंत, सुनिता शिंदे, सुनंदा पाटील, कार्तीकी कदम, शोभा कदम, सविता कदम, माणसी कदम, सुनिता गुजरे, मिराबाई कदम, जिजाबाई जाधव, शल्लुबी तांबोळी, नाजूकबी तांबोळी, सुनिता गरड, संगिता गरड, अंजीरबाई गरड, जयाबाई चौगुले, मिनाबाई पाटील, गवळण गुजारे, भागाबाई गुजारे, इंदाबाई गुजारे, संगिताताई साळुके, लिंबाबाई खडके, अचर्णाताई मेंठेकर, अपर्णा क्षीरसागर, गोदावरी क्षीरसागर आदी महिला, पुरुष, कॉग्रेस पक्षाचे कार्यकरते, गावकरी उपस्थित होते.

## केज राखीव मतदार संघातून चार उमेदवारी अर्ज दाखल.

केज/तात्या गवळी :- केज राखीव विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादीचे पृथ्वीराज साठे आणि भाजपच्या नमिता मुंदडा आणि नमिता अक्षय मुंदडा यांच्यासह सपना सुभाष सुरवसे आणि सतिश विठ्ठल वाघमारे या दोन अपक्ष क्षासह चार नामनिर्देशन पत्र दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी दिली आहे.आज दिनांक २४ आक्टोबर रोजी चार नामनिर्देशन पत्र दाखल झाले आहेत.

**राष्ट्रवादीचे पृथ्वीराज साठे आणि भाजपच्या नमिता मुंदडा यांनी केले अर्ज दाखल.**

१ ) नमिता अक्षय मुंदडा. भा.ज.पा.

२) पृथ्वाराज शिवाजी साठे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरद पवार गट.

३) सपना सुभाष सुखसे, अपक्ष.

४) सतीष विठ्ठल वाघमारे अपक्ष.





## महायुतीचा जाहीरनामा पुढील आठवड्यात!

मुंबई : विशेष प्रतिनिधी महायुतीमधील घटक पक्ष असलेले भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी आपला एकच जाहीरनामा सादर करणार आहेत. पुढच्या आठवड्यात महायुतीचा जाहीरनामा समोर येण्याची शक्यता आहे. तसेच विधानसभा निवडणुकीसाठी तीनही पक्ष वेगवेगळा प्रचार करणार नसून, एकत्रच प्रचार देखील करणार असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान महायुतीसमोर बंडखोरी रोखण्याचे मोठें आव्हान असणार आहे. ज्या इच्छुकांना



विधानसभेचे तिकिट मिळाले नाही ते बंडखोरी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडून भाजप नेत्यांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बंडखोरी टाळण्याचा प्रयत्न करा, बंडखोरी होऊ देऊ नका. कोणत्याही परिस्थितीमध्ये बंडखोरांची समजूत काढा. राज्यातील प्रमुख नेत्यांनी बंडखोरीवर लक्ष ठेवावे, अशा सूचना महायुतीच्या बैठकीमध्ये अमित शाह यांनी नेत्यांना दिल्या आहेत.

## जातीय समिकरणांमुळे फडणवीसांना निवडणूक जड जाणार!

नागपूर : नागपूरमध्ये २००८ मध्ये मतदारसंघाची पुनर्रचना झाली आणि दक्षिण-पश्चिम नागपूर असा एक नवीन मतदारसंघ तयार झाला. २००९ पासून देवेंद्र फडणवीस येथून सलग निवडून येत आहेत. २००९ मध्ये त्यांनी २७ हजार मतांनी काँग्रेसच्या विकास ठाकरेंचा पराभव केला होता.

२०१४ मध्ये ५८ हजारांचं मताधिक्क्य घेत मतदारसंघावर आपलं वर्चस्व प्रस्थापित केलं. मात्र २०१९ पासून या मतदारसंघात भाजपच्या मताधिक्क्यात घसरण झाली. आशिष देशमुख यांच्यासारखा नवखा उमेदवार विरोधात असताना देवेंद्र फडणवीसांचं मताधिक्य आधीच्या निवडणुकीच्या तुलनेत ९ हजारांनी कमी झालं होतं. आता २०२४ ला झालेल्या लोकसभा निवडणुकीतही फडणवीसांच्या मतदारसंघात नितीन गडकरींची लीड ३२ हजार मतांनी कमी झाली. त्यामुळे या मतदारसंघात भाजपची चतिां वाढली आहे.जातीय समीकरणांचे आव्हान? नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघ ओबीसीबहुल आहे. त्यातही कुणबी मतदारांची संख्या जास्त आहे. त्यापाठोपाठ अनुसूचित जाती आणि ब्राह्मण मतदार येतात. इथला अनुसूचित जातीचा मतदार कधीच भाजपच्या बाजूने नव्हता.

## महाराष्ट्र जिंकण्यासाठी मोदींची प्रतिष्ठा पणाला!

नवी दिल्ली : राज्यातील विधानसभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. अनेक पक्षांनी प्रचारसभांचे नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील २८८ मतदारसंघांमध्ये कुठे, कोणत्या ठिकाणी, कोणत्या वेळेत प्रचार सभा घ्यायच्या याचे नियोजन सुरु करण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकांच्या प्रचारतोफा १८ नोव्हेंबर २०२४ रोजी थंडावणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महायुतीतील उमेदवारांच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात ८ दिवस जाहीर सभा घेणार आहेत. येत्या ७ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाराष्ट्रात आहेत. या काळात ते विभागवार सभा घेणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या सभा फक्त भाजपच नाही तर महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी घेतल्या जाणार आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १४ नोव्हेंबरपासून विदेश दौ-यावर आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदींना महाराष्ट्रात सभा घेण्यासाठी कमी कालावधी मिळणार आहे. मात्र या कालावधीतही जास्तीत जास्त सभा कशा घेतल्या जातील, याकडे महायुतीचा कल असणार आहे.

दरम्यान यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत पाहायला मिळणार आहे. त्यासोबतच परिवर्तन महाशक्ती तिसरी आघाडी, वंचित बहुजन आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनाही स्वबळावर निवडणुका लढवताना दिसणार आहे. महायुतीकडून आत्तापर्यंत १८२ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यात भाजपकडून ९९, शिवसेना शिंदे गटाने ४५ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाने ३८ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# ‘मेक इन इंडिया’ची दशकपूर्ती

‘मेक इन इंडिया’ला दहा वर्षे पूर्ण झाली. याचा उद्देश मुख्यत्वे उत्पादन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून देशातील उद्योजकतेला चालना देणे. या दशकपूर्तीनिमित्त याच्या यशापयशाचा घेतलेला आढावा. ‘मेक इन इंडिया’च्या अंतर्गत दहा वर्षांनंतर याचा प्रत्यक्ष परिणाम कशा प्रकारे झाला आहे याचा आढावा घेतला असता खालील बाबी दिसून येतात. उत्पादन क्षेत्र : गेल्या दहा वर्षांची आकडेवारी पाहिली तर भारतातील उत्पादन क्षेत्राची वाढ मंद गतीने झालेली दिसून येते, जी ५.५ टक्के इतकी आहे. त्यामुळे देशाच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये म्हणजे जीडीपीमध्ये उत्पादन क्षेत्राचा वाटा जेमतेम १५ ते १७ टक्के आहे. दहा वर्षांपूर्वी तो १४ ते १५ टक्के होता. म्हणजे त्यात अपेक्षित २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली नाही. दुसर्या बाजूला या क्षेत्रात रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर व्हावी अशी अपेक्षा होती परंतु तीही झालेली नाही. निर्यातीपेक्षा आयात जास्त : गेल्या दहा वर्षातील प्रत्यक्ष निव्वळ भाववाढ लक्षात घेतली आणि जीडीपीची टक्केवारी पाहिली तर आपला विकासदर साधारणपणे सात ते आठ टक्क्यांच्या घरात गेलेला आहे. यामध्ये वाढत्या निर्यातीचा मोठा हातभार लागलेला आहे. २००३ ते २००८ या पाच वर्षांमध्ये निर्यातीवर जास्त भर दिल्यामुळे एकूण आर्थिक कामगिरी चांगली झालेली होती पण त्यावेळीही उत्पादन क्षेत्राची वाढ खूपच मर्यादित झाली आणि याचे प्रमुख कारण म्हणजे निर्यातीपेक्षा आपली आयात जास्त आहे. उत्पादन क्षेत्राची कामगिरी असमाधानकारक : २००१–२००२ या वर्षात उत्पादन क्षेत्राचे एकूण वाढलेले मूल्य हे ८.१ टक्क्यांच्या घरात होते. २०१२–१३ या वर्षात ते ५.५ टक्क्यांपर्यंत खाली आलेले आहे. एवढेच नाही तर गेल्या तीन दशकांमध्ये उत्पादन क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये म्हणजे जीडीपीमध्ये असलेला वाटा हा १५ ते १७ टक्क्यांच्याच घरात आहे. तीन दशकांचा विचार करता या दशकामध्ये त्यात थोडीशी वाढ झालेली दिसते पण त्याचे प्रमुख कारण म्हणजे उत्पादन क्षेत्राच्या वाढीचे मूल्यमापन करण्याच्या निकषात केलेला बदल. या पार्श्वभूमीवर देशातील उत्पादन क्षेत्रामध्ये असलेल्या रोजगारामध्ये वाढ झाली आहे किंवा कसे हे पाहिले असता २०११–१२ या वर्षात या क्षेत्रातील रोजगाराची टक्केवारी साधारणपणे १२.६ टक्क्यांच्या घरात होती. मात्र २०२२–२३ या वर्षात ही रोजगाराची टक्केवारी घसरलेली असून ती ११.४ टक्क्यांच्या घरात आहे. यामध्ये देशातील असंघटित किंवा अनौपचारिक उत्पादन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत असतो. त्याची आकडेवारी लक्षात घेतली तर २०१५–१६ या वर्षात हा रोजगार ३८.८ दशलक्ष होता तो ८.१० दशलक्ष कमी होऊन २०२२–२३ मध्ये ३०.६ दशलक्ष इतका खाली आला आहे. गेल्या दहा वर्षांत देशात एकूणच रोजगार निर्मिती अपेक्षेपेक्षा कमी झालेली आहे व शहरी व ग्रामीण भागातील बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आहे. याचाच अर्थ मेक इन इंडिया या धोरणाचे दुसरे उद्दिष्ट रोजगार वाढवण्याचे होते त्याला अपेक्षित यश लाभलेले नाही. पर्यावरण प्रदूषण : उत्पादन क्षेत्राच्या वाढीबरोबरच देशासमोर गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत ते पर्यावरणाच्या प्रदूषणाचे. घनकचरा व्यवस्थापन हा आपल्याकडे गंभीर विषय आहे. देशाच्या विविध राज्यांमध्ये उत्पादनांसाठी आवश्यक असणारे क्लस्टर निर्माण करण्यात राज्य सरकारे अजूनही गंभीर नाही. त्यामुळे सेवा व पुरवठादारांना योग्यरित्या उत्पादकांना सेवा देणे अवघड होत आहे. ‘मेक इन इंडिया’ क्षेत्रासाठी स्वतंत्र संशोधन व विकास यंत्रणा अद्याप उभी राहिलेली नाही. त्याचप्रमाणे सर्व उद्योगांचा विकास सारख्या प्रमाणात होताना दिसत नाही. वाहन उद्योग क्षेत्राचा विस्तार हा वस्त्रोद्योगांपेक्षा जास्त चांगला आहे. देशातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे औषध निर्माण क्षेत्राला नियंत्रकाची अवास्तव बंधने आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन करण्यामध्ये अनेक अडचणी आहेत. हवेचे प्रदूषण हा देशापुढील महत्त्वपूर्ण व गंभीर विषय आहे. तसेच एरोस्पेस व संरक्षण विभागामध्ये अपेक्षेएवढी वाढ होताना दिसत नाही. त्यास लालफितीचे धोरण कारणीभूत आहे. ‘मेक इन इंडिया’ धोरणाची योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही तसेच केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात समन्वयाचा अभाव आहे. देशात विविध पायाभूत सुविधांची कमतरता आहे. देशात कच्चामाल, वीज आणि वित्त या गोष्टी उत्पादकांसाठी अजूनही महाग आहेत. चीनच्या तुलनेत आपल्याकडे विजेचे दर खूपच जास्त आहेत. त्याचा उत्पादन खर्चावर परिणाम होतो. याचे एक साधे उदाहरण द्यायचे झाले, तर सौर ऊर्जेसाठी लागणार्या बॅटर्यांची किंमत ही चीनमधून आयात केलेल्या बॅटर्यांपेक्षा तब्बल ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. याचा प्रतिकूल परिणाम निर्यातीवर होतो व भारतातील उत्पादकांना उत्पादन करण्यासाठी काही विशेष लाभ होत नाहीत. कामगार कायदे : देशातील कामगार कायदे आजही अत्यंत किचकट आहेत. उत्पादनात वाढ करायची तर ते सहज सुलभ होत नाही. कामगार कायद्यांमध्ये लवचिकता नसल्याचा मोठा फटका उत्पादकांना बसतो. आपले उत्पादक परदेशातून आयात होणार्या कच्च्या मालावर किंवा अन्य पुरवठादारांवर अवलंबून आहेत. भारताच्या किनारपट्टीवरील सर्व बंदरे मोठ्या खोल समुद्रातील नाहीत. परिणामतः आंतरराष्ट्रीय पातळीवरील मोठी मालवाहतूक करणारी जहाजे आपल्याकडे येऊ शकत नाहीत. अन्य देशात माल उतरून तो आपल्याकडे आणावा लागतो. यामुळे इलेक्ट्रॉनिक सारखे क्षेत्र उत्पादनाऐवजी जोडणीवर भर देतात. उत्पादन खर्च कमी ठेवून जागतिक दर्जाची उत्पादने बनवणे हे ध्येय ‘मेक इन इंडिया’चे असले पाहिजे. ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत महत्त्वाच्या बाबी : कच्च्या मालापासून ते वीज वाहतूक व अन्य सर्व सुविधा उत्तम दर्जाच्या मिळाल्या तरच देशातील उत्पादन क्षेत्र चांगले काम करू शकेल. अन्यथा अशा घोषणा केवळ कागदावरच राहतील. काही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये परदेशी थेट गुंतवणूक आकर्षित करणे यावर भर देणे आवश्यक आहे. मारुती सुझुकी, ॲपल कंपनीची उदाहरणे डोळ्यासमोर ठेवून ‘मेक इन इंडिया’चा विस्तार झाला पाहिजे. अन्यथा अल्प यश व लक्षणीय अपयश हेच ‘मेक इन इंडिया’च्या धोरणात दिसून येते. त्यासाठी आत्मसंतुष्ट न राहता खर्या अर्थाने आवश्यक त्या सर्व ठिकाणी कार्यक्षम सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे.निर्यात स्नेही उद्योग धोरण व विविध देशांबरोबर व्यापारी करार यावर जास्त भर देण्याची गरज आहे. देशातील रोजगार निर्मितीचाही तो एक योग्य मार्ग आहे. आजच्या घडीला निर्यात तंत्रज्ञान व उत्पादन या सर्व क्षेत्रात चीन आघाडीवर आहे आणि ते कोठेही बडेजाव मिरवत नाहीत. आपण शांतपणे योग्य धोरण राबवले तर जगात उत्पादन क्षेत्राचे मुख्य केंद्र बनणे आपल्याला अवघड नाही. या सगळ्यांवर मात केली तरच ‘मेक इन इंडिया’ हे धोरण पुढील पाच वर्षांत अपेक्षित यश मिळवू शकेल असे वाटते. प्रत्यक्ष तळापर्यंत जाऊन विविध विषयांची योग्य सोडवणूक करण्याची नितांत गरज आहे.

# वारंवार एकाच परिवारातील व्यक्ती लोकप्रतिनिधी–जनप्रतिनिधी रहाने कीतपत योग्य!

हे मतदारांनी ठरविण्याची योग्य वेळ.

राजकीय पक्षांच्या घरानणेशाहीने व परिवारवादाने सर्वसामान्यांच्या राजकारणाचा सत्यानाश केला; आता मतदारांवर यांचा करेक्ट कार्यक्रम करण्याची वेळ आलेली आहे. देशात व राज्यात असे झाले आहे की सर्वच राजकीय पक्षांतील पुढाऱ्यांना वाटते की आपल्याच घरामध्ये राजकीय सत्ता असावी.कारण त्यांच्याजवळ असलेली वाममार्गाने कमविलेली अमाप चल–अचल संपत्ती यावर कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई होवू नये यासाठी राजकीय पुढारी संपूर्ण हद्दीपार करायला सुध्दा मागेपुढे पाहत नाही.तीच परिस्थिती आज महाराष्ट्रातील राजकारणात सक्रिय झाल्याचे दिसून येते. बाप आजी–माजी आमदार–खासदार–मंत्री असतो त्यामुळे आपला मुलगा किंवा मुलगी किंवा बायको आमदार किंवा मोठा राजकीय पुढारी व्हायला हवे यासाठी ताकदीनिशी शक्य तेवढे प्रयत्न करतो. वेळ पडल्यास पक्ष बदलवितो,करोडो रूपये खर्च करून टीकीटे आणतो व निवडणुकीत पाण्यासारखा पैसा ओततो व आपल्या मुलाला किंवा मुलीला किंवा बायकोला निवडून आणतो.त्याच ठिकाणी त्यांच्या विरोधात उभा असलेला सर्वसामान्य उमेदवार पैशाच्या अभावामुळे निवडणुक हरतो.त्यामुळे आज सर्वसामान्यांना वाटते की राज्य चालविण्याचा किंवा राजकारण करण्याचा ठेका लिमिटेड कंपनी सारख्या राजकारण्यांपुरताच सिमीत असल्याचे दिसून येते.उदाहरण द्यायचे झाले तर ठाकरे परिवार,राणे परीवार, भुजबळ परिवार, पवार परिवार, चव्हाण परिवार असे राज्यात अनेक परिवार आपल्याला दिसून येईल की यांच्या घरचा एक किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती राजकीय पदावर म्हणजेच आमदार–खासदार–मंत्री असलेले दिसुन येतात व घराणेशाही व परिवारवाद टीकवुन ठेवतात.यावरून स्पष्ट होते राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वसामान्यांचा बळी घेतात व संपूर्ण राजकारण व सत्ता आपल्या घरात ठेवतात.परंतु हाडामासाचा जो कार्यकर्ता असतो त्याचा घराणेशाही व परिवारवाद बळी घेतात.उदाहरण द्यायचे झाले तर निलेश राणे भाजपमध्ये असतांना व शिंदे गटासोबत युती असतांना शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये जाण्याची काय गरज होती.परंतु सत्ता जास्तीत जास्त आपल्या घरामध्ये असावी याच उद्देशाने राणे परिवारासारखे असे अनेक परिवार आपल्याला सत्ता काबीज करतांना पहायला मिळतात.यामुळे सर्वसामान्यांचा कळत–नकळत घात होतो व राजकीय बळी जातो.राजकीय पुढारी सांगतात की जातीयवाद नको.परंतु हेच राजकीय पुढारी जातीय समीकरणे तयार करून निवडणुका लढवितात.म्हणुनच अनेक राजकीय पुढारी जरांगे पाटलांच्या भेटीला जातांना दिसतात. जातीयवाद हेच राजकीय पुढारी तयार करतात व आपल्याला सांगतात जातीयवादामुळे व्देष भावना निर्माण होते हे कितपत योग्य म्हणावे!त्यामुळे असे वाटते की घराणेशाही व परिवारवाद ही सर्वसामान्यांच्या राजकारणातील मोठा अरथडा आहे.आज परिवार वादांमुळे हाडामासाच्या कार्यकर्त्यांना उमेदवारी पासून माघारी घ्यावी लागत आहे किंवा अपक्ष किंवा इतर कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश करून उमेदवारी घेतांनाचे चित्र दिसून येते. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने योग्य आणि अचुक वेळ आली आहे की घराणेशाही व परिवारवादाचा करेक्ट कार्यक्रम मतदारांनी योग्य मतदान करून केला पाहिजे व घराणेशाही व परिवावादाची ठेकेदारी जळामुळासकट बंद करायला हवी यातच आपल्याला खरी लोकशाही दिसून येईल.राज्यातील स्वतंत्र पुर्वकाळातील थोर महात्मे, क्रांतिकारक, मवाळवादी–जहालवादी सर्वांनाच घेऊन चालायचे तेंव्हाच स्वतंत्र लढा उभा झाला व देश स्वतंत्र झाला.परंतु स्वतंत्र झाल्यानंतर सध्याचे राजकारण घराणेशाही व परिवावादाने जखडल्याने सर्वसामान्यांन पुढे अनेक नवीन –नवीन समस्या निर्माण झाल्याचे चित्र दिसून येते.

***********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# गेमचेंजर परमरुद्र

स्वदेशी परमरुद्र आणि तीन सुपरकॉम्प्युटरच्या माध्यमातून आकाशगंगेची उत्पत्ती, कृष्णविवर, खगोलशास्त्र आणि हवामान क्षेत्र यामधील अनेक महत्त्वाची माहिती मिळण्यास मदत मिळणार आहे.

परमरुद्रशिवाय अन्य दोन सुपर कॉम्प्युटरचे नाव अरका आणि अरुणिका असे ठेवण्यात आले आहे. देशाला लाभलेले हे तीन महासंगणक पर्यावरण, हवामानबदल यासह अनेक क्षेत्रात भारतासाठी उपयुक्त ठरणार आहेत. महासंगणक हे सामान्य संगणकांच्या तुलनेत अनेक पटीने वेगाने काम करू शकतात. त्यांच्या क्षमतेचे आणि कामगिरीचे आकलन करायचे झाल्यास सुपर कॉम्प्युटरने काही मिनिटांत केलेली गणना करण्यासाठी पर्सनल कॉम्प्युटरला ५०० वर्षे लागतात.

दुसर्या पद्धतीने सांगायचे तर, यामध्ये एकाच वेळी इतकी माहिती आणि डेटा प्रक्रिया केली जाऊ शकते की पृथ्वीपासून सूर्यापर्यंतच्या १० लाख परिक्रमांइतकी गणना काही तासांत पूर्ण होऊ शकते. परमरुद्र महासंगणक हे एकाचवेळी प्रचंड प्रमाणात डेटाला प्रोसेस करू शकतात आणि ही बाब सामान्य संगणकांच्या आवाक्यात नाही. या महासंगणकाचा उपयोग सामान्यपणे संशोधन आणि शास्त्रज्ञांसाठी केला जातो.

सद्यस्थितीत जागतिक पातळीवर चीनकडे सर्वाधिक सुपर संगणक आहेत. त्यानंतर अमेरिका, जपान, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड, आयर्लंड आणि ब्रिटनचा क्रमांक लागतो. महासंगणकांच्या दुनियेत आघाडीच्या ५०० संगणकांच्या यादीत पाकिस्तानचे नाव कोठेही नाही. त्यांच्याकडे कमी दर्जाचे महासंगणक आहेत.

तुलनेने चीन, अमेरिका आणि जपान आघाडीवर आहेत. चीनकडे २१९, अमेरिकेकडे ११६, जपानकडे ३५, जर्मनीकडे २५ आणि फ्रान्सकडे १८ महासंगणक आहेत. भारताकडे टॉप ५०० च्या यादीत ११ पेक्षा अधिक महासंगणक आहेत. विशेष म्हणजे भारताचे महासंगणक हे गणना करण्यास खूपच आधुनिक आहेत. परम अनंत, परम शिवाय, परम शक्ती, परम ब्रह्म यासारख्या महासंगणकांचा जगात अगोदरच बोलबाला झाला आहे. परमरुद्र हा याच क्रमातील आधुनिक श्रेणी मानली जाते. सर्वसाधारणपणे विज्ञानातील सुपरकॉम्प्युटिंगचे योगदान हे वास्तवाच्या अगदी जवळ जाणे आहे. सुपरकॉम्प्युटरची ही क्षमता मानवांना उत्पादनांची उत्तम रचना करण्यास आणि उत्पादन, पेट्रोलियम, औषधनिर्माण आणि लष्करी क्षेत्रातील चांगल्या कामगिरीचा अंदाज लावण्यास मदत करते.

अमेरिकेतील टेनेसी विद्यापीठातील ट्युरिंग पुरस्कार विजेते एमेरिटस प्रोफेसर जॅक डोंगरा यांनी या क्षमतेची तुलना क्रिस्टल बॉलशी केली. ते म्हणतात, दोन आकाशगंगा आदळल्यावर काय होते हे कसं समजणार? मी दोन आकाशगंगा घेऊ शकत नाही आणि त्यांना एकत्र क्रॅश करू शकत नाही. अशा स्थितीत, मला एक मॉडेल बनवावे लागेल आणि ते सुपरकॉम्प्युटरवर पहावे लागेल. १९८० च्या दशकात अनेक गोष्टींसाठी आपण विकसित देशांवर अवलंबून होतो. त्यातही संगणकाचा समावेश होता. अमेरिकेने आपल्याला महासंगणक आयात करण्याची परवानगी नाकारली होती. २१ व्या शतकाच्या प्रारंभी अमेरिकेने दिलेला नकार हा विकासाची शिखरे गाठण्याची स्वप्ने पाहणार्या भारतीयांच्या मनाला लागला. तेव्हा ‘सीडॅक’ आणि त्याचे प्रमुख डॉ. विजय भटकर यांनी देशात महासंगणक तयार करण्याचे ठरविले आणि त्याचे नाव ‘परम’ असे ठेवले. १९९१ मध्ये भारताला स्वदेशी तंत्रज्ञानाचा ‘परम ८०००’ हा महासंगणक मिळाला. त्यानंतर ‘परम’मध्ये वेळोवेळी बदल झाले. नंतरच्या काळात केंद्र सरकारने महासंगणकाच्या संशोधनाला गती देण्यासाठी राष्ट्रीय महासंगणक मोहीम सुरू केली.

# आज माझ्यातला भीम इथं मीच केला उणा दोष देऊ कुणा , दोष देऊ कुणा ?.

जरी संकटाची काळरात होती
तरी भिमराया तुझी साथ होती
तुझी तेवण्याची सुरुवात होती
प्रकाशात माझी पिढी न्हात होती

महाकवी वामनदादा कर्डक यांचं हे गीत आमच्या जीवनाची पूर्वपीठिका सांगून जाते.म्हणूनच आम्ही सुध्दा आमच्या जगण्याचा श्वास ऑक्सीजन बाबासाहेबाना समजतो कारण हजारो वर्षांचा इतिहास सांगतोय आम्ही गुलाम होतो आणि शूरवीर सुद्धा होतो.या जात्यांध गुलामगिरीला नष्ट करण्यासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवाची पर्वा न करता.प्रणांकित प्रचंड संघर्ष करून आम्हाला स्वाभिमानी माणसाचं जीवन बहाल केलं.हे मानूसपणाचं जीवन सहाजा सहजी मिळालेलं नाही.या मागे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग आहे. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर माणसाला माणूसपण मिळण्यासाठीचा संघर्ष करीत असतांना प्रचंड जीवन झिजवित होते.वडील रामजी बाबांचं निधन, लाडक्या मुलाचं निधन आणि उपाशीपोटी राहून बाबासाहेबांचा संसार चालविणारी नऊ कोटीची माय माऊली माता रमाईचं निधन या कडे बाबासाहेबांचं दुर्लक्ष झाले असे नाही.पण समाजासाठी प्रचंड अभ्यास,संघर्ष,देश विदेश दौरा अख्या देश समाजपरिवर्तना साठी भ्रमण करणं हे ही आवश्यक होतं.म्हणून त्यांच्या कुटुंबाची झालेली होरपळ आणि आपलं जीवन फुलवण्यासाठी त्यांच्या कुटुंबाची झालेली हानी ही प्रचंड प्रमाणात आहे.म्हणून याची भरपाई आपण कशी भरून देणार? हे समाजाने समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.पण आपल्याच समाजातील काही महाभाग एकाच वर्गाचे अतिशहाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घराण्याला प्रस्थापितांच्या सांगण्यावरून मुद्दाम जाणीवपूर्वक टार्गेट करून खोटे नाटे आरोप करून सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या अकलेचे तारे तोडत असताना आपल्याला दिसून येतात.ही आपल्या साठी अत्यंत लाजीरवाणी बाब आहे.

मित्र हो ! समाजमनात प्रचंड जातियद्वेश कलह असताना समाजातील प्रतिभावंत कवी,लेखक,पत्रकार,समाजसेवक,विचारवंत,साहित्यिक यांनी गप्प बसणे म्हणजे षंडाचे लक्षण होय. आपल्यातील काँग्रेस + भाजपच्या लाभार्थी गद्दार महा विचारवंतांना सोडून दया त्यांना त्यांचे काम करावे लागते.कारण त्यांना त्यांची वैचारिक सालगडी म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते.

आज आपल्या समाजात अनेक प्रश्न भयावह असताना आंबेडकरी चळवळीला मजबूत करण्याचे सोडून हे काही महाभाग आंबेडकरी घराण्याच्या विरोधात जाणिवपूर्वक बोलतांना दिसतात.या वेळी त्यांची जीभ का झिजत नाही.त्यांच्या बुद्धीची मला कीव येते.अरे काही ही कारण नसतांना आपल्या घरात ओढून ताणून आणलेले वाद किती तानायचे याचे तरी भान ठेवा नाही तर येणारी पिढी तुम्हाला कधीच माफ करणार नाही.कारण बाबासाहेबांचा संघर्ष हा एका रात्रीतून जन्माला आला नाही.म्हणून याची जाणीव ठेऊन आपण वागायला पाहिजे.

गेल्या कित्येक वर्षांपासून श्रद्धेय ड. बाळासाहेब आंबेडकर हे स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आंबेडकरी समूह,आदिवासी समूह,भटक्या विमुक्त जाती समूह,ओबीसी समूह,मुस्लिम समूह हा सत्तेत कसा बसविता येईल यासाठी त्यांचे सोशल इंजिनिअरिंग चालू आहे.हे आपण समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.परंतू हे सर्व करीत असताना आपल्यातील काही स्वतःला विचारवंत समजणारी मंडळी प्रस्थापितांची लाभार्थी होऊन बाबासाहेबांच्या विचाराने श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर चालत असताना त्यांच्या सत्ता संपादणाच्या लढ्यात अडथळा निर्माण करतात.ही प्रवृत्ती अत्यंत घातक आहे. आंबेडकरी चळवळीची झुल पांघरून आपल्याच माणसाला फसवतात. ही खूप मोठी शोकांतिका आहे. हे आता कुठं तरी निवडणुकीच्या माध्यमातून समाजाच्या समोर आले आहे. एकीकडे आंबेडकरी चळवळीच्या किंवा आंबेडकरीवादाच्या पोट तिडकीने गप्पा करून आपल्या भोळ्या भाबड्या समाजासमोर विचारवंताच्या रूपाने उभे राहून हळूच आपल्या जीवनाचे अस्तित्व नेस्तनाबूत करणाऱ्या शत्रूच्या गोटात जाऊन सामील होऊन त्यांच्याच इशाऱ्यावर आपल्याच समाजाची दिशाभूल करून ऐन मोक्याच्या वेळेला बाळासाहेबांच्या वंचित बहुजन आघाडीच्या चळवळीला विरोध करणारी ही माणसं खरोखर आपली होऊ शकतात काय? म्हणजेच आपल्याच माणसाने जीवलाऊन घेतलेला जीव याचा संताप समाजात होत आहे हे साहजिकच आहे.

श्रद्धेय ड.बाळासाहेब आंबेडकर यांचं राजकारण आणि समाजकारण म्हणजे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारे आहे.हे प्रथम अभ्यासकांनी समजून घेणे गरजेचे आहे.कारण ज्यांना बाबासाहेब समजले त्यांनाच बाळासाहेब समजतील हे सूर्य सत्य आहे. बाळासाहेब समाजातील सर्व वंचित घटकांना जवळ करून आपला राजकीय प्रवास मर्गक्रमित करीत आहेत.मोठ्या कष्टाने ते अठरा पगड जात समूहातील प्रत्येक माणूस जोडून त्याला त्याचं प्रतिनिधित्व कसं प्राप्त करून देता येईल या साठी त्यांची धडपड प्रचंड प्रमाणात आहे. मग यात बाळासाहेबांचे चुकते कुठे? का परिवर्तन करणे हा गुन्हा आहे का ? मग समाज माध्यमात बाळासाहेबांच्या बदनामीचे षडयंत्र कोण चालविते ? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. या मागचे दुसरे तिसरे कोणी नसून आपल्यातील काही फितूर लेखक,कार्यकर्ते,काँग्रेस भाजप कडून पाकीट घेऊन मोकळे होतात आणि बाळासाहेब आणि त्यांच्या पक्षाला बदनामी करण्यासाठी नांदी लागतात.मूळ शत्रू समोर येत नाही.तो आपल्याच माणसाच्या हातून आपली हत्या करायला निघाला म्हणून बाळासाहेब जीव तोडून सांगतात. मी हारात नाही इथं तुम्ही मला हरवता. हे बाळासाहेबांचे शब्द आपल्याला शरमेने मान खाली घालवायला लावतात.केवळ या गद्दार लोकांमुळे म्हणून समाजाने हे सर्व समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे.समाजात तसे काही आदरणीय लेखक मंडळी आहेत. ते आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी आज ही धडपडत आहेत.त्यांच्या प्रति मी नतमस्तक होतो.पण जी काही तथाकथित आंबेडकरी चळवळीची झुल पांघरून समाजाची फसवणूक करतात त्यांच्या बद्दल समाजाने संताप व्यक्त करावा की नाही ?

जाणिव पूर्वक बाळासाहेबांची बदनामी ही निवडणुका तोंडावर आल्या की केल्या जाते.या सर्व गोष्टींचा समाजमनात संताप आहे असे नाही.पण आपलेच घरभेदी इतक्या टोकाला जातात की त्यांच्या घराण्याची इभ्रत काढल्या जाते.ही चूक आपण किती दिवस सहन करणार आहोत.बाळासाहेब यांच्यावर टीका केली जाते की ते भाजप ची बी टीम आहे,हे म्हणणारे आघाडीवर कोण तर आपलेच याही पुढे जाऊन ते थांबत नाहीत तर बाळासाहेब हे हिंदू देव देवतांची पूजा आरती करतात. यांच्याकडे या व्यतिरिक्त कोणतेच कारण नसते.या विषयी मला माझ्यातील विचारवंत,कार्यकर्ता, समाज बांधव यांना सांगावेसे वाटते. अरे बाबा श्रद्धेय ड.बाळासाहेब आंबेडकर हे एक राष्ट्रीय नेते असून लोकनेते आहेत.बाबासाहेबांचे संविधान आपल्या देशात आहे.या संविधानाने आपल्याला लोकशाही दिलेली आहे.या मुळे तुम्हाला तुमचे राजकीय गणित जुळवायचे असतील तर सर्व धर्म पंथाच्या कार्यक्रमात तुम्हाला जावेच लागेल.हा फार मोठा संशोधनाचा विषय नाही आहे. दुसऱ्या पक्षातील लोक त्यांच्या फंडातून किती तरी बुध्द विहार आपण बांधून घेतले.म्हणून आपण त्या ठिकाणी बुद्ध वंदना घेतोच ना की नाही.मुळात काहीच कारण नसतांना ओढून ताणून आरोप निर्माण करणे प्लीज थांबवा मित्रांनो.हे आपल्या हिताचे आहे. जाणिव पूर्वक बाळासाहेबांची आणि वंचित बहुजन आघाडीचा फेक नेरेटीव्ह समाजात पसरवून दिशाभूल करतात.मला आपल्या सर्वांना एकच सांगायचे आहे की तुम्हाला आंबेडकरी नेतृत्व मारायचे की जिवंत ठेवायचे आहे ?

माझ्या तमाम माय बाप आंबेडकरी समाजाला मला सांगायचे आपल्या समाजातील जे काही मोजकेच लाचार समाज नासविणारे काही लेखक,काही कार्यकर्ते,काही स्वार्थांध संघटना आहेत.यांनी कृपया आपल्या पूर्वजांचा इतिहास अभ्यासून राजकारण करा, स्वतःच्या स्वार्थासाठी समाजाला मारू नका नाही तर हा आंबेडकरी समाज तुम्हाला कधीच माफ करणार नाही.ऐवढे मात्र तुम्ही लक्षात ठेवा.काय तर विचारवंताच्या घरा समोर निदर्शने केली म्हणून निषेध ची एक पोस्ट व्हायरल होत आहे. या मध्ये ज्याला काहीच माहीत नाही तो ही निषेध नोंदून मोकळा होत आहे. अरे बाबा आपण निषेध कोणाचा करतो,काय म्हणून करतो हे तर जाणून घ्या हे कश्यासाठी तुम्ही नौटंकी करता.या माध्यमातून बाळासाहेबांची आणि वंचित कार्यकर्त्यांची प्रचंड प्रमाणात बदनामी करण्याचे दिसून येते.हे तुम्ही कुणाच्या इशाऱ्यावर करत आहात.हे सर्व समाजाला माहीत आहे.एवढा समाज दुधखुळा नाही आहे.

मला इथे पुन्हा आवर्जून सांगायचे आहे. श्रद्धेय ड.बाळासाहेब आंबेडकर यांचा कार्यकर्ता हा आंबेडकरी चळवळीची निष्ठा आणि भूमिका स्पष्ट असलेला कार्यकर्ता आहे.तो सभ्य प्रवृत्तीचा आहे. जाणिव पूर्वक ट्रोल करत नाही.तो बोलत ही असेल तर पुरावा सादर करून बोलतो.मग त्याचे बोलणे तुम्ही येवढे मनाला का लाऊन घेता ? चुकीला चूक नाही म्हणावे तर काय म्हणावे ? याही गोष्टीचा तुम्ही निषेधाच्या बातम्या झळकावत असाल तर निषेध ही तुमचा निषेध केल्याशिवाय राहणार नाही. कारण श्रद्धेय ड.बाळासाहेब आंबेडकर समजून घेण्यासाठी प्रथम तुम्हाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर समजून घ्यावे लागतील.बाळासाहेब समजण्यासाठी वंचित बहुजन आघाडीची भूमिका समजण्यासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक विचारांपैकी पुढील एक विचार मी त्यांचा स्पष्ट करतो. बाबासाहेब म्हणतात. तुमच्यातच नव्हे तर या देशात एक विचित्र विकृती दिसून येते.ती ही की आज झाड लावले की त्यास दुसऱ्या दिवशी फळ खावयास आले पाहिजे असे लोकांना वाटते. राजकारणात अशी अपेक्षा धरणे चूक आहे. तुम्हाला सत्तेचे फळे चाखावयाची असल्यास वंचित बहुजन आघाडीला बळकट करण्यासाठी आपल्या सर्व बहुजन व आंबेडकरी अनुयांनी झटले पाहिजेत.बाळासाहेबांना सहकार्य करून आंबेडकरी नेतृत्व गतिमान करता येईल तरच आपण या समाजात स्वाभिमानाने जीवन जगणार आहोत.नाही तर महाकवी वामनदादा कर्डक सांगून गेले

माझ्यातला भीम इथं मीच केला उना
दोष देऊ कुणा दोष देऊ कुणा ?

आपल्याला आंबेडकरी नेतृत्व टिकवायचे असेल तर चला बाळासाहेबांना साथ देऊया.

**********

देवानंद पवार.
९१५८३५९६२८,
औरंगाबाद संभाजी नगर.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे, चेअरमन वैशालीताई देशमुख, संचालीका अदिती अमित देशमुख यांच्या पदयात्रांना ऊस्फुर्त प्रतिसाद








लातूर / प्रतिनीधी :- लातुर शहर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस महाविकास आघाडीचे जनसंपर्क अभियान सुरु केले असून बुधवार दि. २३ मार्च रोजी सायंकाळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महाराणा प्रताप नगर (म्हाडा कॉलनी), विलास कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी खाडगाव, खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी रायवाडी तर टवेन्टिवन ग्रीच्या संचालीका अदिती अमित देशमुख यांनी सिंकदरपूर येथे प्रचारार्थ पदयात्रा काढून नागरीकांशी संवाद साधला, या चारही ठिकाणी नागरीकांचा ऊस्फुर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी पदयात्रेचे औक्षण करुन स्वागत करण्यात आले. यावेळी महारणा प्रमाप नगर येथे लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, व्हा.चेअरमन विजय देशमुख, महाराणा प्रताप नगरच्या सरपंच संगीता पतंगे, उपसरपंच राजकुमार पवार, महाराणा प्रताप नगरचे निरीक्षक तथा बाभळगाव उपसरपंच गोविंद देशमुख, विद्याताई पाटील, शिवाजी देशमुख, राम स्वामी, हमीद बागवान, यशपाल कांबळे, सुंदर पाटील कव्हेकर, सचिन बंडापल्ले, अकबर माडजे, अभिषेक पतंगे, सहदेव मस्के, युनूस मोमीन, विजयकुमार पतंगे, नामदेव उपाडे, सज्ञाद पठाण, आडे, लता कांबळे, सुलोचना उपाडे, मुजोद्दीन इनामदार, युसुफ शेख आदीसह काँग्रेस महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते स्थानिक नागरीक उपस्थित होते. म्हाडा कॉलनी येथून पदयात्रेला सुरुवात झाली, त्यानंतर माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी हनुमान मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले त्यानंतर कुशिनारा बुद्ध विहार इथे जाऊन बुद्ध वंदना केली तसेच त्यांनी मतदान जनजागृती पथनाट्य सादर करण्यात आलेल्या कलाकारांचे कौतुक करून त्यांचा सत्कार केला. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, गेल्या अडीच वर्षातील महायुती सरकारच्या कारभारामुळे महाराष्ट्राची लूट मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. महाराष्ट्रात भ्रष्टाचार फोफावला आहे, जनता असुरक्षित आहे, महिलावर दलित अल्पसंख्यांक भटके विमुक्त यांच्यावर मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत आहेत. सामान्य माणसाची सध्या पिळवणूक होत आहे, महाराणा प्रताप नगर, बाभळगाव, म्हाडा कॉलनी येथे पूर्वी काही नव्हते. सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी लोकनेते विलासराव देशमुख यांनी या वसाहतीची निर्मिती केली या कॉलनीमध्ये बंगले इमारती उभ्या राहिल्या ही सुबत्ता काँग्रेसमुळे आली असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की लातूरात आज सर्वजण गुण्यागोविंदाने उद्योग व्यवसाय व्यापार करतात २०१९ ते २०२४ या पाच वर्षात लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी आम्ही २२५० कोटी रुपये चा निधी खेचून आणला महाराणा प्रताप नगर येथे ७० कोटी रुपये मंजूर केले पाणीपुरवठा योजना ही येथील ५४ कोटीची मंजूर केली सध्याच महायुती सरकार ४० टक्के कमिशन वाली सरकार आहे काँग्रेसच इमान कधीही डगमगलेला नाही काँग्रेस पक्षने सर्व धर्म समभाव कायम जोपासला आम्ही एक हेल्पलाइन सुरू करत आहोत की जीवर फोन करायचा तुम्ही तुम्ही जिथे तिथे अडचणीत असाल तिथे येऊन तुम्हाला आमदार अमित देशमुख यांचा प्रतिनिधी मदत करेल बेकारी महागाई भ्रष्टाचार खुटलेले औद्योगीकरण यासारख्या गंभीर समस्या महायुती सरकारने निर्माण केले आहेत लातूर जिल्हा रुग्णालय आम्ही मंजूर केले त्याची वीट सुद्धा या सरकारला रचता आली नाही आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत या परिसरात राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखा लवकर स्थापन कराव्यात लातूर आतील अवेध धंदे गुन्हेगारी कमी झाली पाहिजे लातूर आतील जनतेला सुरक्षित वाटले पाहिजे असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की महायुतीचे नेते प्रचाराला आले की तुम्ही त्यांना जाब विचारा मागच्या अडीच वर्षात तुम्ही काय काम केले ते रेल्वेच्या कारखान्यात लातूरकरांना एकही नोकरी मिळाली नाही भाजप नेते उजनीतून पाणी आणू म्हणाले नाही पाणी आणले तर राजकारणातून संन्यास घेऊ म्हणाले त्यांनी आता राजकारणातून संन्यास घ्यावाच मी स्वतः अमित देशमुख आहे असे समजून काँग्रेस महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी प्रचार करावा येत्या २० नोव्हेंबरला सर्वांनी हाताच्या पंजा समोरील बटन दाबून काँग्रेस महाविकास आघाडीला मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले. खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी रायवाडी येथे सांधला मतदारांशी संवाद लातूर लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी रायवाडी येथे जाऊन गावातील सर्व मतदारांची घरोघेरी जाऊन थेट भेट घेतली. यावेळी मतदारांशी त्यांनी संवाद साधला. चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी खांडगाव येथील नागरीकांशी सांधला संवाद श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी महिला मतदारांची घेतली थेट भेट सध्या विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. त्यानिमित्ताने विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी दि. २३ ऑक्टोबर रोजी लातूर तालुक्यातील खाडगाव येथे थेट महिला मतदारांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.काँग्रेस महाविकास आघाडीला पुन्हा एकदा आशिर्वाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. खाडगाव येथे बुधवारी संवाद मेळाव्याचे आयोजन केरण्यात आले होते. प्रारंभी श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी गावातून पदयात्रा काढून महिला मतदारांची थेट भेट घेतली.या पदयात्रेस महिला मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.त्यानंतर आयोजित संवाद मेळाव्यात त्यांनी संवाद साधला. यावेळी काँग्रेसच्या नेत्या सुनिताताई अरळीकर, लातूर पंचायत समितीच्या माजी सभापती शितलताई फुटाणे, खाडगावचे सरपंच नेताजी देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक युवराज जाधव, अनंत बारबोले, अभिनंद जाधव, सविता देशमुख, कांताबाई मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना वैशालीताई देशमुख म्हणाल्या, थापा मारुन जनतेची दिशाभूल करणे हेच भाजपा महायुतीचे भांडवल आहे.जनतेच्या विकासाच्या योजनांचा दृष्टीकोन त्यांच्याकडे नाही.या उलट काँग्रेस महाविकास आघाडी जनसामान्याच्या सर्वांगीण विकासाचे 'व्हीजन' घेऊन आपल्यासमोर येत आहे. विधानसभेच्या निवडणुकीत लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून माजी मंत्री आमदार अमित देशमुख व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून आमदार धिरज देशमुख यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन केले. याप्रसंगी भास्करराव जाधव, दौलतराव देशमुख, स्वाती देशमुख, सविता देशमुख, आशाताई मलवाड, कांताबाई मगर आदीसह कॉग्रेस पक्षाचे पधादिकारी व गावकरी उपस्थित होते. टवेन्टिवन ग्रीच्या संचालीका अदिती अमित देशमुख यांनी सिंकदरपूर येथे जाऊन मतदारांची घेतली भेट टवेन्टिवन ग्रीच्या संचालीका अदित अमित देशमुख यांनी सिंकदरपूर येथे जाऊन मतदारांची भेट घेतली. गावातील विशेषता महीला, नवमतदारांनी त्यांची भेट घेतली.

## तेलंग यांनी शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राचे नेतृत्त्व करावे प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचे प्रतिपादन



लातूर : - सुधाकर तेलंग यांनी मागील २५ वर्षांपासून शिक्षणाधिकारी पदापासून विभागीय सहसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण सचिव आदी पदांवर काम केले आहे. त्यांची शिक्षण सहसंचालक म्हणून पदोन्नती झाली आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राचे नेतृत्त्व करावे, असे प्रतिपादन संस्थाचालक संघटनेचे कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले आहे. लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे सचिव सुधाकर तेलंग यांची शिक्षण सहसंचालकपदी पदोन्नती झाली आहे. त्यानिमित्त त्यांचा व त्यांच्या सुविद्य पत्नी उषा तेलंग यांचा शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी प्राचार्य केंद्रे बोलत होते. यावेळी 'आरसीसी'चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, 'जुक्टा' संघटनेचे मार्गदर्शक प्रा. मुकुंद बोकारे, वसंतराव पाटील, 'जुक्टा' संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष प्रा. संभाजी वडजे, प्रा. मारुती सूर्यवंशी, प्रा. सिध्देश्वर शेटे, प्रा. टाले, पेंढारकर, प्रकाश भाजगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, तेलंग यांची एक कर्तव्यदक्ष अधिकारी व कवी म्हणूनही लातूर विभागातच नाही तर महाराष्ट्रात ओळख आहे. कार्यकुशलतेमुळे लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर विभागीय शिक्षण मंडळाचा अतिरिक्त पदभार त्यांच्याकडे देण्यात आला होता. आता त्यांची शिक्षण सहसंचालक म्हणून पदोन्नती झाली असून ही त्यांच्या कार्याची पावती आहे. त्यांनी अशी प्रगती करावी, अशा शुभेच्छाही प्राचार्य केंद्रे यांनी दिल्या.

## दिवाळीत घरीच बनवा मऊ रसरशीत गुलाबजाम, जाणून घ्या परफेक्ट रेसिपी

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला आहे. सध्या दिवाळीची रंगत तयारी सर्वत्र सुरु आहे. घराची साफसफाई, फराळ या सर्व गोष्टींना आता सुरुवात झाली आहे. हिंदू धर्मात दिवाळी सणाला फार महत्त्व असते. या सणानिमित्त जागोजागी दिव्यांची रोशनाई असते. दिव्यांच्या प्रकाश आपल्या या सणात पाहायला मिळतो. आता सण म्हटला की मिठाई आलीच. आज आम्ही तुम्हाला भारतीय मिष्टान्नातील एका प्रसिद्ध आणि लोकप्रिय पदार्थाची रेसिपी सांगत आहोत. हा पदार्थ म्हणजे, गुलाबजाम. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच गुलाबजाम हा पदार्थ फार आवडतो. तोंडात जाताच विरघळणारे हे गुलाबजाम तुम्ही घरीदेखील बनवू शकता. त्यामुळे आता यंदाच्या दिवाळीला बाजारातून गुलाबजाम आणायची काहीच गरज नाही. घरी तुम्ही झटपट रसरशीत गुलाबजाम तयार करू शकता. यासाठी लागणारे साहित्य आणि कृती जाणून घ्या. साहित्य मावा - २५० ग्रॅम छेना - १०० ग्रॅम मैदा- ४ टेस्पून बेकिंग पावडर - १/२ टीस्पून दूध - २-३ चमचे (आवश्यकतेनुसार) तेल - तळण्यासाठी साखर - २ कप पाणी - १ कप वेलची - २-३ केशर धागे - काही गुलाब पाणी - १ टेबलस्पून कृती गुलाबजाम तयार करण्यासाठी सर्वप्रथम गॅसवर एक पातेलं ठेवा यानंतर यात पाणी आणि साखर टाकून व्यवस्थित ढवळा साखर पूर्णपणे विरघळल्यानंतर त्यात वेलची आणि केशर घाला व्यवस्थित पाक तयार झाला की गॅस बंद करा पाक तयार झाला की नाही तपासण्यासाठी पाक हलके बोटावर घेऊन याची तार खेचली जात आहे की नाही ते तपासा दोन बोटांवर चिटकून जर याची तार खेचली गेली तर तुमचा पाक तयार आहे आणि नाही तार आली तर आणखीन काही वेळ याला शिजू द्या आता एका भांड्यात मावा आणि छेना घ्या आणि चांगले मिसळा मग यात मैदा आणि बेकिंग पावडर घालून हलक्या हाताने चांगले मळून घ्या तुम्ही यात ड्रायफ्रुटस बारीक करून देखील घालू शकता आता तयार पिठाचे लहान गोळे तयार करा यानंतर गॅसवर कढई ठेवा आणि यात तेल टाका तेल गरम झाले की मध्यम आचेवर हे गोळे छान सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या तळलेले गोळे गरम पाकात टाका आणि ३-४ तास यावर झाकण ठेवून द्या यानंतर तयार गुलाबजाम खाण्यासाठी सर्व्ह करा

## हिमोग्लोबिनची पातळी सतत वाढल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतील? वाचा डॉक्टरांचे मत



कोणत्याही गोष्टीचे खूप जास्त प्रमाण किंवा कमी प्रमाण शरीरासाठी चांगले नसते. जसे की हिमोग्लोबिनची पातळी (पुरुषांसाठी पेक्षा कमी आणि स्त्रियांसाठी ) कमी असल्यास वैद्यकीय उपचारांची गरज भासते. त्याचप्रमाणे हिमोग्लोबिनची पातळी वाढणे हे देखील एक चिंतेचे कारण आहे. अशा प्रकारे जर तुमच्या शरीरात हिमोग्लोबिनची पातळी सातत्याने वाढत राहिली तर त्याचा शरीरावर नेमका काय परिणाम होतो पाहू हिमोग्लोबिन म्हणजे काय? हिमोग्लोबिन हे लाल रक्तपेशींमधील प्रथिने आहे, जे संपूर्ण शरीरात ऑक्सिजन वाहून नेण्याचे काम करते. जेव्हा शरीरात हिमोग्लोबिनची पातळी खूप जास्त असते (पुरुषांसाठी पेक्षा जास्त आणि स्त्रियांसाठी ) तेव्हा रक्त घट्ट होते आणि त्याची प्रवाहाची गती मंदावते; ज्यामुळे गुंतागूंत होण्याचा धोका वाढतो, अशी माहिती हैदराबादमधील लकडी का पूल येथील ग्लेनेगल हॉस्पिटल्सचे सल्लागार आणि क्रिटिकल केअर विभागाचे एचओडी डॉ. मनेंद्र यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना दिली. ते पुढे म्हणाले की, शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढण्यामागे उंचीवर राहणे, दीर्घकाळ धूम्रपान करणे, निर्जलीकरण किंवा क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) सारखी काही कारणे आहेत, यामुळे शरीरात ऑक्सिजनचे सेवन मर्यादित होते. अधिक गंभीर प्रकरणांमध्ये म्हणजे पॉलीसिथेमिया वेरासारखा अस्थिमज्जा विकारामुळे शरीरात खूप जास्त लाल रक्तपेशी निर्माण होतात, हा एक दुर्मीळ रक्त रोग आहे, असेही डॉ. मनेंद्र म्हणाले. शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढण्यामागची कारणं हिमोग्लोबिनच्या पातळीत अचानक वाढ होण्यास अनेक घटक कारणीभूत ठरू शकतात. यात दिवसभर पाणी न पिणे या कारणाचादेखील समावेश आहे. अशा स्थितीत निर्जलीकरणासह शरीरात रक्ताचे प्रमाण कमी होऊ शकते. यावर मिरा रोडमधील वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे सल्लागार हेमॅटोलॉजिस्ट डॉ. मुरलीधरन सी म्हणाले की, हृदयविकार, फुफ्फुसाचे आजार आणि काही रक्त विकार असलेल्या व्यक्तींच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण जास्त असते. हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढल्यास शरीरावर काय परिणाम होतील? १) रक्ताच्या गुठळ्या : रक्तात जाड गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढवतो, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक किंवा डीप वेन थ्रोम्बोसिस होऊ शकतो. २) उच्च रक्तदाब : रक्तात वाढलेल्या जाडसर आणि चिकटपणामुळे रक्तदाब वाढू शकतो. ३) थकवा आणि चक्कर येणे : उच्च ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता असूनही रक्ताभिसरणाचे कार्य बिघडल्याने थकवा येऊ शकतो. हिमोग्लोबिनची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी उपचार शरीरात हिमोग्लोबिनची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी पहिल्यांदा ती कोणत्या कारणांमुळे वाढतेय हे शोधा आणि त्यावर नियंत्रण ठेवा.

त्यात थेरपीटिक फ्लेबोटॉमी किंवा लाल रक्तपेशींचे उत्पादन कमी करण्यासाठी आणि रक्त गोठण्याचे धोके कमी करण्यासाठी काही औषधांची मदत घेऊ शकता, पण डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच ती औषधं घ्या, असे डॉ. मनेंद्र म्हणाले.

## दोन आजार, ज्यामुळे अवयवाचे नुकसान होऊ शकते, माहीत असायलाच हवे

पेरिफेरल व्हॅस्कुलर डिसीज (पीव्हीडी) आणि पेरिफेरल न्यूरोपॅथी (पीएन) हे दोन आजार आहेत, ज्यांचे सामान्य जागरूकतेच्या अभावामुळे निदानाचे प्रमाण कमी आहे. पीव्हीडी व पीएन हे सामान्य आजार आहेत, ज्यांची लक्षणे समान आहेत आणि या आजारांवर उपचार न केल्यास गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात, कदाचित अवयव विच्छेदन व स्ट्रोक्सचा त्रास होऊ शकतो. पीव्हीडीमुळे रक्तवाहिन्या अरूंद होतात, ज्यामुळे पायामध्ये व शरीरामध्ये रक्तपुरवठा खंडित होतो. मधुमेह व इतर आजारांच्या गुंतागूंतीमुळे मेंदू व पाठीचा कणा (पेरिफेरल नर्व्ह) बाहेरील नसांचे नुकसान झाल्यास पीएन आजार होतो. फोर्टिस सहयोगी एसएल रहेजा हॉस्पिटलमधील डायबेटिक फूट अँड अँकल सर्जन डॉ. राजीव सिंग यांनी अधिक माहिती दिली आहे. झतऊ म्हणजे नक्की काय? पीव्हीडी हा रक्ताभिसरणाशी संबंधित आजार आहे, ज्यामध्ये ब्लॉकेजेस्, आकडी येणे आणि रक्तवाहिन्या अरूंद होणे अशी लक्षणे आढळून येतात. पीएन आजारामध्ये शरीर सुन्न पडणे, हातापायांना मुंग्या येणे आणि अंगावर शहारे येणे अशी लक्षणे आढळून येतात. मधुमेह व लठ्ठपणा यांसारखे को-मोर्बिडीटीज असल्यास पीव्हीडी आणि पीएनमुळे गंभीर आरोग्यसंबंधित समस्या निर्माण होऊ शकतात. काय आहे अनुभव पीएन आणि पीव्हीडीमुळे डायबेटिस मेलिटस असलेल्या रूग्णांमध्ये विच्छेदनाचा धोका वाढतो. नुकतेच आम्ही अशाच प्रकारच्या या केसची हाताळणी केली, ज्यामध्ये मॉरिशसमधील ५६ वर्षीय गॅरेज मेकॅनिक अहमदला (नाव बदललेले) त्याच्या उजव्या पायासाठी विच्छेदन करण्याचा सल्ला देण्यात आला होता.

# गांधी चौक पोलीसांची उत्कष्ट कामगीरी. अपहरण प्रकरणातील आरोपींना १० तासाचे आत ताब्यात घेवून अपहरत मुलाची सुटका.

लातूर :- गांधी चौक पोलीसांची उत्कष्ट कामगीरी. अपहरण प्रकरणातील आरोपींना १० तासाचे आत ताब्यात घेवून अपहरत मुलाची सुटका.

याबाबत थोडक्यात माहिती की, पोस्टे गांधीचौक हद्दीमध्ये दि. २२/१०/२०२४ रोजी फिर्यादीने फिर्याद दिली की, त्याचे मुलास दिनांक २२/१०/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. सुमारास मांजरा आर्युवेदीक महाविद्यालय समोर, गांधी मार्केट, लातूर येथून काही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीच्या बहीनीच्या नावे असलेल्या जमीनीच्या वादातून अपहरण करून खुन करण्याच्या उद्येशाने जोरजबरदस्तीने झटापट करुन धाक दाखवून पळवून घेवून गेले आहे. अशी तक्रार दिल्याने पोलीस ठाणे गांधी चौक येथे आरोपीचा विरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदरचा गुन्हा दाखल होताच आरोपीतांचा शोध घेणे कामी श्री. सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक सो, डॉ. अजय देवरे अपर पोलीस अधीक्षक, बी. चंद्रकात रेड्डी सहा.पोलीस अधिक्षक, चाकुर चार्ज लातूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली साहेबराव नरवाडे पोलीस निरीक्षक यांनी तात्काळ पथक तयार करून अपहरण करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान गुन्ह्यातील आरोपीनी अपहरण केलेल्या पिडीत मुलाचा खून करण्याच्या उद्देशाने येरमाळा येथून बार्शीकडे जात असल्याची माहिती पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांना मिळाली त्यावर सदर पथकाने तात्काळ बार्शी ग्रामीण पोलीसांशी संपर्क करुन आरोपींबाबत नाव व वर्णनाची माहिती देवून नाकाबंदी लावण्या




सांगितली त्यावरून बार्शी ग्रामीण पोलिसांनी ताबडतोब रस्त्यावर नाकाबंदी लावली गांधी चौक च्या पथकाने सदर गाडीचा पाठलाग सुरूच ठेवला. अपहरणातील आरोपींचा पाठलाग करीत नमूद पथकाने आरोपींना बार्शी तालुका पोलिस यांच्या समवेत ताब्यात घेऊन विचारपूस केली असता तेव्हा नमूद आरोपींनी त्यांचे नाव नामे

१) नरसिंग ऊर्फ मुन्ना राजकुमार कांबळे, वय ४२ वर्षे, रा- नवीन रेणापूर नाका, साई रोड, आर्वी . लातूर
२)तुकारामवामनरावसाळुंके,वय४३वर्षे,रा.नवरत्ननगर,आर्वी,लातूर
३) मंगेश नागनाथ वंजारे, वय ३८ वर्षे, रा. चिकलठाणा, लातूर
४) शंकर अंगद कोयाळकर, वय ३४ वर्षे, रा. नवीन रेणापूर नाका, मारोती मंदीर समोर आर्वी,लातूर असे असल्याचे सांगून त्यांच्यासोबत असलेल्या व अपहरण केलेल्या मुलास गुन्ह्यात वापरलेल्या टोयाटो कंपनीची कार एमएच १० बीएम ४५५६, लोखंडी चाकू, काळ्या रंगाचे एयर पिस्टल सह ताब्यात घेवुन पोस्टे गांधी चौक येथे दाखल गुरनं. ६९१/२०२४ कलम १३७(२),१४० (१), ३५१(२), ३५१ (३), ३(५) भारतीय न्यायसंहिता २०२३ गुन्हयात अटक करुन मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता मा. न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे सहाय्यक पोलीस अधीक्षक बी चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पोलीस ठाणे गांधी चौक चे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या नेतृत्वातील पदकायाने अतिशय शीघ्रगतीने कारवाई करत काही तासातच अपहरण गुन्ह्यातील आरोपींना एअरगन,लोखंडी चाकू, गुन्ह्यात वापरलेले वाहनसह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांचे नेतृत्वातील पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक आक्रम मोमीन, पोलीस अमलदार वाजिद चिखले, संपत कांदे, राजेंद्र टेकाळे, शिवाजी पाटील, संतोष गिरी, बाळू सारोळे, प्रकाश भोसले, राम गवारे यांनी केली आहे.

# आळसना येथे प्रवर्णा दिन साजरा



शेगांव :- शेगाव तालुक्यातील आळसना येथील लुम्बीनी बुद्ध विहार येथे वर्षावास निमित्ताने बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथाचे वाचण सुरू करण्यात आले होते. त्याचा समारोप व प्रवर्णा दिन दिनांक २०/१०/२०२४ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

वर्षावास सुरू असताना बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन करून धम्माविषयी जनजागृती केली जाते. या कार्यक्रमाला प्रा. विलास तायडे, विनोद विरघट, जीवन डोंगरे, वृक्षपाल पहूरकर, सुमेध धनबहादुर हे उपस्थित होते. विनोद विरघट यांनी संघाचे महत्व पटवून देताना सामाजिक एकीकरण, व एकीकरणातुन शैक्षणीक व सामाजिक विकास कसा साधला जातो यावर महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. तरूणांनी शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक विकास करून सामाजिक हित जोपासले पाहिजे यावर भर देऊन तरुणांना डोळस दृष्टिकोन दिला तर जिवन डोंगरे यांनी धम्माचे महत्त्व सांगुन, धम्म वैज्ञानिक कसा व जगाला व माणसाला धम्म कसा तारु शकतो यावर सखोल असे मार्गदर्शन केले. वर्षावास व इतर माध्यमातून ही वैचारिक प्रबोधनाचे कार्यक्रम नियमित व्हायला पाहिजे अशी अपेक्षा सुद्धा जीवन डोंगरे यांनी व्यक्त केली. प्रा. विलास तायडे यांनी शिक्षणा सोबतच आर्थिक विकास व आर्थिक विकास हा नोकरी व व्यवसायच्या माध्यमातून करू शकतो असे प्रतिपादन करून उपस्थितां मध्ये धम्मा विषयी जनजागृती केली. कार्यक्रमाची सुरवात हरिदास तायडे यांनी त्रिसरण पंचशील देऊन केली. ग्रंथांचे वाचन प्रदिप पहुरकर, पंकज पहुरकर व दिपंकर पहुरकर यांनी केले. कार्यक्रमांचे संचालक बंडु इंगळे यांनी केले तर उपस्थिती मान्यवरांचा स्वागत- वृक्षपाल पहुरकर, प्रदिप पहुरकर, बंडु इंगळे, सहदेव पहुरकर, विनोद पहुरकर यांनी केले. ग्रंथवाचनाची शेवटची गाथा व आभार प्रदर्शन प्रदिप पहुरकर यांनी केले. लुम्बीनी बुद्ध विहार आळसना च्या सर्व सदस्यांनी व आयोजकांनी कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी परिश्रम केले.

# बहिष्कार म्हणजे विकास नव्हे, मतदानाचा हक्क बजवावा सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांचे आवाहन

किनवट/शेख शौकत :-मागील पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीवर किनवट तालुक्यातील पांगरपाड येथील गावकऱ्यांनी त्यांच्या मूलभूत भौगोलिक सोयी-सुविधांसह इतर मागण्यांसाठी मतदानावर बहिष्कार टाकला होता. परंतु, मतदानावर बहिष्कार म्हणजे विकास नव्हे, सर्वांनी मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी केले आहे. मागील पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीवर किनवट तालुक्यातील पांगरपाड येथील गावकऱ्यांनी त्यांच्या मूलभूत भौगोलिक सोयी-सुविधांसह इतर मागण्यांसाठी मतदानावर बहिष्कार टाकला होता. जवळपास जि.प.प्रा. शाळा पांगरपहर या घटनेला आता पाच महिने पूर्ण होत आले आहे, तरी त्यांना त्यांच्या हक्काच्या मुलभूत भौगोलिक सोयी सुविधांसह शासनाच्या इतर योजनेचा लाभ मिळत नसल्याने शेतकरी राशन कार्ड धारकांना प्राधान्य अथवा एपीएल, बीपीएल राशन कार्डमध्ये समाविष्ट करून घ्यावे, तसेच निराधार महिलांसाठी पेन्शन योजना लागू करावी, रेवानाईक तांडा ते कंचेली रस्त्यावरील पुलाची उंची वाढवून द्यावी, मोबाईल टावर रेंजची सुरुवात करणे, पांगर पहाड ते आमगाव जोड रस्ता करून देणे अशा १२ विविध मागण्या घेऊन गावकऱ्यांच्या वतीने येथील सरपंच महिला संजिरा संदेश जाधव यांनी पुन्हा एकदा किनवटच्या तहसीलदार शारदा चौडेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केल्याने किनवटच्या



तहसीलदार शारदा चाँडेकर व मंडळ अधिकारी लाटकर,तलाठी एम.टी. बोधे, ग्रामसेवक,परमेश्वर झरीकर,यांनी पांगरपाड या गावाला प्रत्यक्ष भेट देऊन येथील नागरिकांशी त्यांच्या हक्काच्या मूलभूत सोयी सुविधांसह इतर मागण्यांवर चर्चा केली. यावेळी माझ्या स्तरावर जे काही तुमच्या मागण्या आहेत ते मी सोडवीन व इतर मागण्या आहेत ते मी वरिष्ठांना कळविलं असे त्यांनी सांगितले. किनवट तालुक्याच्या सहाय्यक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मेघना कावली यांनी मतदानावर बहिष्कार म्हणजे तुमचा विकास नव्हे भारतीय संविधानाने तुम्हाला तुमच्या मतदानाचा हक बजावण्यासाठी जो काही अधिकार दिला आहे, तो मतदानाचा अधिकार आपण बजवावा व इतर तुमच्या काही मागण्या असतील त्या मागण्या आम्हाला स्वरूपात कळवाव्या. आम्ही ते सोडवण्याचा प्रयत्न करू पण मतदानापासून आपण वंचित राहू नये किंवा मतदानावर बहिष्कार टाकू नये जो काही मतदान करण्याचा आपला अधिकार आहे ते आपण मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन किनवटच्या सहाय्यक जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी मेघना कावली यांनी सर्व मतदार बंधूंना आवाहन केले आहे.

# वडखेल येथील तुकाराम देवकते यांचे निधन

परळी वैजनाथ / प्रतिनिधी :- परळी तालुक्यातील वडखेल येथील ज्येष्ठ नागरिक तुकाराम मारोती देवकते यांचे राहत्या घरी दुःखद निधन झाले आहे. वडखेल ग्रामपंचायतचे सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलचे तालुकाध्यक्ष गणेश देवकते यांचे ते वडील होत. शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ८. वाजता वडखेल येथे त्यांचा अंत्यविधी करण्यात येणार आहे.



वडखेल येथील ज्येष्ठ नागरिक तुकाराम मारोती देवकते यांचे गुरुवार दि. २४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास त्यांची राहत्या घरी प्राणज्योत मालवली. मृत्युसमयी ते ६५ वर्षांचे होते. ते अत्यंत मनमिळावू व धार्मिक स्वभावाचे होते. कै. तुकाराम मारोती देवकते हे सर्वांशी सुपरिचित व्यक्तिमत्व होते. कै. तुकाराम देवकते हे वारकरी होते. त्यांनी तंटामुक्तीचे अध्यक्षपद १० वर्ष भुषविले आहे. अनेक सामाजिक कार्यात ते अग्रणी होते. त्यांच्या अचानक निधनामुळे सर्वत्र शोककळा पसरली. कै.तुकाराम मारोती देवकते यांच्या पाश्चात्य २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दिवंगत तुकाराम देवकते यांच्या पार्थिवावर आज परळी तालुक्यातील वडखेल येथे सकाळी ८ वा. अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### नगरसेविकेसह पतीवर केज पोलिसात गुन्हा दाखल.

# केजच्या नगरसेविकेचा महा प्रताप चक्क वारसांची नावे लपवून नगरसेविकेने केली न्यायालयासह नातेवाईकांची फसवणूक.

**न्यायलयात वारसाचा दावा.**

ओमप्रकाश रांजणकर यांनी केज येथील कनिष्ट स्तर दिवाणी न्यायालयात त्यांचे वडील प्रल्हाद रांजणकर व आई विमल रांजणकर यांचे मुख्याधिकारी केज यांचे स्वाक्षरीचे मृत्यू प्रमाणपत्र यासह नगरसेविका पत्नीच्या सहीचे वारस प्रमाणपत्र देवून न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्रासाठी दावा केला.

**पतीच्या बनावाला पत्नीची पुष्टी.**

दोन जिवंत भाऊ, आणि दोन मयत भावांच्या पत्नी व त्यांची मुले ही कायदेशीर प्रापर्टीचे वारस असताना खोटा दावा दाखल केलेला असताना सुद्धा नवऱ्याच्या बचावासाठी नगरसेविकेने न्यायालयात खोटे शपथपत्र दाखल केले.

केज/तात्या गवळी :- केजच्या नगरसेविकेचा महा प्रताप चक्क वारसांची नावे लपवून नगरसेविकेने केली न्यायालयासह नातेवाईकांची फसवणूक केल्याप्रकरणी नगरसेविके सह पतीवर केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज नगरपंचायतीच्या नगरसेविकेने पदाचा गैरवापर करत, मृत सासूच्या इतर वारसांची नावे लपवून, पती व स्वतः असे दोघेच वारस असल्याचे प्रमाणपत्र नगरपंचायतींकडून मिळवले. या प्रमाणपत्राअधारे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी खोटे प्रतिज्ञापत्र जोडून न्यायालयाचीफसवणूककेली.याप्रकरणीनगरसेविकासौ. पल्लवी रांजणकर व त्यांचे पती ओमप्रकाश रांजणकर या ददोघांविरुद्ध केज पोलीसात गुन्हा दाखल




झाला आहे. नगरसेविका सौ. पल्लवी ओमप्रकाश रांजणकर यांच्या सासू विमलबाई रांजणकर यांचे १९ जुलै २०२२ रोजी निधन झाले. विमलबाई यांना पाच मुले होती. त्यापैकी मंगेश रांजणक रांजणकर, अनिल रांजणकर व ओमप्रकाश रांजणकर हे हयात आहेत. मेघराज रांजणकर व सतीश रांजणकर हे मृत आहेत. नगरसेविका सौ. पल्लवी रांजणकर यांनी स्थावर व जंगम मिळकतीवर वारसांचे नाव लावण्यासाठी पदाचा गैरवापर केला. त्यावरून नगरसेविका सौ. पल्लवी रांजणकर व ओमप्रकाश रांजणकर या दोघांविरूद्ध केज पोलिसात गु.र. नं.५ ६०/ २० २४ भादवि १९८, १९९, २९०, ३४, ४२०, ४६५, ४६८, ४७१ नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास हा सहाय्यक पोलीस अधिक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन करत आहेत. दिराने दिली तक्रार विमलबाई यांचे वारस ओमप्रकाश रांजणकर व सून म्हणून स्वतः हे दोघेच वारस असल्याचे प्रमाणपत्र, नगरसेविका रांजणकर यांनी नगरपंचायतींकडून मिळवले. इतर वारसांची नावे लपवून पती व स्वतःचे खोटे प्रतिज्ञापत्र जोडले. तसेच न्यायालयाकडे वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी २५ ऑगस्ट २०२२ रोजी अर्ज दाखल केला आहे. या दांमपत्याने न्यायालयाची फसवणूक केल्याची तक्रार, नगरसेविका सौ. पल्लवी रांजणकर यांचे दीर मंगेश रांजणकर यांनी दिली.

# दक्षिण मुंबई बौद्धजन सेवा संघाच्या वतीने वर्षावास मालिका समारोप कार्यक्रम उत्साहात संपन्न

मुंबई :- दक्षिण मुंबई बौद्धजन सेवा संघ, भारतीय बौद्ध महासभा (दक्षिण मुंबई झोन क्र. १), बौद्धजन पंचायत समिती, बौद्धजन सहाय्यक संघ, सार्वजनिक जयंती उत्सव समिती, माझगाव, ताडवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात येत असते, सालाबादप्रमाणे याही वर्षी आयोजित प्रवचन मालिकेचा सांगता समारंभ सोमवार दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ७:०० वाजता दक्षिण मुंबई सेवा संघाचे अध्यक्ष आणि बौद्धजन पंचायत समितीचे चिटणीस व गटक्रमांक ३ चे गटप्रतिनिधी भगवान तांबे यांच्या अध्यक्षतेखाली नालंदा बुद्धविहार, माझगाव, ताडवाडी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी उपस्थित पाहुण्यांच्या शुभहस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार हार अर्पण करून ज्योत प्रज्वलित करण्यात



आली, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश जाधव यांनी लाघवी भाषाशैलीत करून उपस्थितांची मने जिंकून घेतली, तर पाहुण्यांचे स्वागत दीपक श्रीरसागर यांनी केले, कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर करताना अध्यक्ष भगवान तांबे यांनी दक्षिण मुंबई विभागात बौद्धजन सेवा संघ आणि अंतर्गत मोडणाऱ्या सर्व संघटनांच्या वतीने सर्वांच्या सहकार्याने अनेक उपक्रम राबविण्यात येतात व ते यशस्वीपणे पार पाडले जातात, सदर कार्यक्रम ही आपण त्याचप्रमाणे सादर करीत आहोत व असेच अनेक उपक्रम भविष्यात ही आपण राबवू असे नमूद केले. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सचिव अशोक केदारे यांनी अश्विन पौर्णिमा या विषयावर सखोल असे मार्गदर्शन करून उपस्थितांना मौलिक अशी माहिती दिली, सरतेशेवटी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या मोहन मर्चंडे, अभिषेक जाधव, मीनाक्षी सकपाळ, लक्ष्मी जाधव, उर्मिला जाधव, दिपक मिर्के, गोपीनाथ कदम, बबन भद्रिगे, सुभाष गमरे, उत्तम रोकडे, मिलिंद सकपाळ, बौद्धाचार्य बबन गायकवाड, संजीवन यादव, प्रकाश तांबे, आनंद कदम, विश्वास मोहिते, विकास बल्लाळ, विकास सोनवणे, मिलिंद लोखंडे, महादेव रोकडे, अनिल सोनावणे, शंकर उबाळे, अनिल सोरटे, दीतेश जाधव, प्रतिक मिर्के, मोहनिष महेंद्र जाधव, नितिन सखाराम जाधव, संतोष मोहिते, सदानंद तांबे, संतोष थोरात, विजय गायकवाड, अजित परिहार, अनिल वाघमारे, किशोर काशिकेदार, शांतू डोळस, सिद्धार्थ कांबळे, श्रीधर जाधव आदी मान्यवर या सर्वांचे संघाच्या चिटणीस ॲड. अनुराधा प्रदीप साळवे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE